जा.कं. /लेखा/3805/2024
लेखा व वित्त विभाग, बीड दि. 04/04/24
**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**

नगर रोड, बीड
**फोन : 02442– 221203**
**mahbeedc@mhstate.nic.in**

## निविदा सुचना

विषय : चतुर्थश्रेणी पात्र पुरूष कर्मचा–यांकरिता गणवेषासाठीचे पांढरे रंगाचे टेरिकॉट (पॉलिस्टर 67 % व कॉटन 33 % ) कापड व चतुर्थश्रेणी पात्र महिला कर्मचा–यांकरिता टेरिकॉट (पॉलिस्टर 48% व कॉटन 52 % ) साडी फिक्कट निळया रंगाची व काळी किनार असलेली रंगाची बॉर्डर व ब्लाउज फिक्कट निळा रंगाचे खरेदी करणेकरिता निवीदा पाठविणे बाबत...

महोदय,

सविनय सेवेत सादर की, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. उद्योग उर्जा कामगार विभाग क्र. भांसस 1088 नुसार (2512) उद्योग 6 दि. 02/01/1992 मधिल परिशिष्ट 5(2) नुसार दोन वर्षातुन एकदा पुरूष चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना कापड पांढरे रंगाचे तीन ड्रेस व महिला कर्मचारी यांना 3 साड्या फिक्कट निळया रंगाची व काळी किनार असलेली रंगाची बॉर्डर व ब्लाऊज फिक्कट निळे रंगाचे ब्लाउजसह पुरवठा करणेबाबत नमुद केलेले आहे.

मा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, बीड यांचे आदेशावरून आपणास कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथील जिल्हा न्यायालय व तालुका न्यायालयातील पात्र चतुर्थ श्रेणी एकुण 136 पुरूष कर्मचा–यांकरीता व 16 महिला पात्र कर्मचा–यांकरिता गणवेषासाठी टेरिकॉट (पॉलिस्टर 67 % व कॉटन 33 % ) कापड पांढरे रंगाचे व साडी फिक्कट निळया रंगाची ( टेरिकॉट पॅन्टचे कापड पांढरे रंगाचे अंदाजे 530.40 मिटर पॅन्ट करिता व शर्टकरीता टेरिकॉट कापड पांढरे रंगाचे अंदाजे 918 मिटर कापड ) व एकुण 16 महिला कर्मचा–यांसाठी टेरिकॉट (पॉलिस्टर 48% व कॉटन 52 % ) साडी फिक्कट निळया रंगाची व काळी किनार असलेली रंगाची बॉर्डर व ब्लाऊज फिक्कट निळा रंगाचे सहित एकुण 48 नग साड्या व ब्लाउज पीस 38.40 मिटर उच्च प्रतीचे व गुणवत्तेचे साडया खरेदी करणेसाठी नमुन्या सोबत वाहतुक खर्च व जी.एस.टी. करासह खालील तक्त्याचे वर्गीकरणाप्रमाणे निवीदा देण्यात यावी.

| अ.क | कापडाचा प्रकार | दर प्रति मिटर / नग (जी.एस.टी. सह) |
|---|---|---|
| 1 | **सुटींग कापड –टेरिकॉट (पॉलिस्टर 67 % व कॉटन 33 % ) पांढरे रंगाचे (पॅन्ट)कापड कंपनीचे नावा सोबत नमुना देणे.** | ....................................प्रति मिटर |

| अ.क | कापडाचा प्रकार | दर प्रति मिटर / नग (जी.एस.टी. सह) |
|---|---|---|
| 1 | **सुटींग कापड –टेरिकॉट (पॉलिस्टर 67 % व कॉटन 33 % ) पांढरे रंगाचे (शर्ट) कापड कंपनीचे नावा सोबत नमुना देणे.** | ....................................प्रति मिटर |

**साडी – टेरिकॉट (पॉलिस्टर 48% व कॉटन 52 % ) फिक्कट निळया रंगाची व काळी किनार रंगाची बॉर्डर असलेली साडी,**

| |
|---|
| **दर प्रति नग जी.एस.टी. सह ..............................प्रति नग/प्रति मिटर**<br>**ब्लाऊज — फिक्कट निळा रंगाचे 0.80 से.मी. प्रत्येक ब्लाऊज ................प्रति नग/प्रति मिटर.**<br>**टिप :— ब्लाऊज पीस साडी सोबत असेल तर, ब्लाउज पीस वेगळे घेण्याची आवश्यकता नाही.** |

करीता आपण आपली निवीदा बंद पाकीटामध्ये दिनांक २२/04/2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत जिल्हा न्यायालय, बीड येथे पोहोचेल अशी पाठवावी. वरील निवीदा खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील व निवीदा स्विकारणेचा हा पूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड यांचा राहिल. सदरील बंद पाकीटावर " **चतुर्थश्रेणी पुरूष व महिला कर्मचा–यांकरीता गणवेशासाठीचे कापड व साडी** " असे लिहिणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :–**

01) निविदेत नमुद दराप्रमाणे नमुना म्हणुन**(sample)**एक पॅन्टपीस कापड पांढरे रंगाचे व एक शर्टपीस कापड पांढरे रंगाचे व एक नग साडी फिक्कट निळया रंगाची व काळी किनार असलेली रंगाची बॉर्डर व ब्लाऊज फिक्कट निळा रंगाचे ब्लाउजपीस सह उपलब्धकरून द्यावी.

02) दुकानदाराने प्रत्येक पुरुष कर्मचा–यास प्रत्येकी एका कर्मचा–यास 03 पॅन्टकरीता लागणारे एकुण कापड 3.90 प्रमाणे व शर्टकरीता प्रत्येक पुरूष कर्मचा–यास 6.75 मिटर कापड कटींग करून द्यावे.

03) निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर सी.जी.एस.टी./ एस. जी.एस.टी. कमांक नमुद करणे आवश्यक आहे. जर नसेल तर तत्सम प्राधिकारणाकडील नोंदणी कमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील पदपत्रक वैध असतील.

04) प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा / दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.

05) कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्यानंतर 15 दिवसाच्या आत वरील तक्यात नमुद केल्याप्रमाणे कापडाचा पुरवठा करण्यात यावा.

06) विक्रेत्याचे बिल देयक या न्यायालयास प्राप्त झाल्यानंतर लवकरात लवकर चेकव्दारे (धनादेश) अदा करण्यात येईल.

**एक प्रत** :– संगणक विभाग प्रमुख, जिल्हा संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, बीड यांनी सदरील निविदा सुचना जिल्हा न्यायालय, बीडच्या वेबसाईडवर अपलोड करावी.

आदेशावरून

04-04-2024.

प्रबंधक

जिल्हा न्यायालय. बीड.

Akosh
Civil Clerk
Dist. C. Beed

BIS